**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,रायगड- अलिबाग**

| **केंद्र शासन पुरस्कृत योजना** |
|---|
| **1.प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण :- (PMAY-G)**<br>❖ पीएमएवाय-जी-2016 /प्र.क्र.39/योजना-10 दि.27मे 2016 शासन निर्णय अन्वये<br>➢ लाभार्थी घटक:- अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती/इमाव/खुला/अल्पसंख्यांक(SC/ST/OBC/Minority)<br>➢ प्रती घरकुल अनुदान रक्कम रु.1,20,000/- (रक्कम रु.एक लाख वीस हजार) |
| **2.प्रधानमंत्री जनमन योजना (PMJANMAN)**<br>❖ शासन निर्णय क्रमांक प्रआयो-2024/प्र.क्र.18/योजना-10दि.13 फेब्रुवारी 2024<br>➢ लाभार्थी घटक:- /अनुसुचित जमाती (ST) /आदिम जमातीतील(कातकरी)<br>➢ प्रती घरकुल अनुदान रक्कम रु.2,00,000/-(रक्कम रु.दोन लाख)<br>➢ **प्रति घर चे एकूणक्षेत्र- 269 चौरस फूट (Hall/Kit/toilet/Ac sheet roof)**<br>➢ **सदर सर्व योजनांअंतर्गत घरकूल बांधकाम पूर्ण करणेसाठी अतिरीक्त अनुदान इतर योजनेतुन उपलब्ध होऊ शकते त्या योजनाखालील प्रमाणे**<br>➢ मनरेगा =रू.27000/-(अंदाजे 90 दिवसांची मजूरी स्वरूपात)<br>➢ संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम- रू.12000/-(शौचालय बांधकाम करणेबाबत.) |

# ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या माध्य्मातून कुशल गवंडी व प्रलंबित घरकुलांची निर्मिती -

रायगड जिल्हयात महाआवास अभियान सन 2023-24 मध्ये घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचे उदिष्ट प्रशिक्षण देणारी संस्था मेरापत यांनी पेण आणि रोहा तालुक्यातील 220 गवंडयांना प्रशिक्षित केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत प्रलंबित घरकुले प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाचा उपयोग करुन घरकुले पूर्ण करण्यात येत आहे. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनविणे व या पॅनेलमधील गवंडयांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेणे, इ.बाबतचे काम प्रगती पथावर आहे. यामुळे अभियान कालावधीत प्रलंबित घरकुले पूर्ण होण्याच्या कामास गती मिळाली असून मोठया प्रमाणात कुशल गवंडी व रोजगार निर्मिती होत आहे. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणांमुळे गुणवत्तापूर्ण घरकूलांची निर्मिती होत आहे.